RNI NO. - MAHMAR/2023/87923

SWARAJYADOOT

# स्वराज्यदूत

www.swarajyadoot.com पहारेकरी सत्याचा.. कैवारी बहुजनांचा..!


**आजचा शुभ विचार**

"जो मनुष्य मरायला
तयार होतो तो
कधीच मरत नाही
आणि जो मरायला
भितो तो आधीच
मेलेला असतो."
डॉ. बाबासाहेब आंबेडकर







मुख्य संपादक - श्री. भास्कर जी. देवरे | उपसंपादक - श्री. शांताराम देवरे | कार्यकारी संपादक- श्री. मनोहर देवरे | निवासी संपादक- श्री.संतोष बी.मोहिते

DAILY ▪ MARATHI ▪ YEAR- 3 ▪ ISSUE-29 ▪ Published from NASHIK (MAH) ▪ Saturday 31 May 2025 ▪ PAGES 6 ▪ Price - 4 Rs.

दैनिक ▪ मराठी ▪ वर्ष ३ ▪ अंक २९ ▪ नाशिक ( महाराष्ट्र ) येथून प्रकाशित ▪ शनिवार, दि. ३१ मे २०२५ ▪ पाने ६ ▪ ₹ ४ रुपये


## ग्रामपंचायत ते विधानसभा शत प्रतिशत भाजपचे उद्दिष्ट – रवींद्र चव्हाण

प्रवीण उंबरकर
मलकापूर प्रतिनिधी
दैनिक स्वराज्यदूत

----------------------------




ग्रामपंचायत ते विधानसभा, शत प्रतिशत भाजप' हे उद्दिष्ट असून, त्यानुसार सशक्त भारत निर्माण करायचा आहे. भाजप हीच काळाची गरज असल्याचे लक्षात घेऊन त्यादृष्टीने सर्वांनी पावले उचलावीत, असे आवाहन भाजपचे प्रदेश कार्याध्यक्ष, आमदार रवींद्र चव्हाण यांनी केले.

मलकापूर- कराड येथे भाजपतर्फे आयोजित महिला मेळावा व कार्यकर्ता पक्षप्रवेश कार्यक्रमात ते बोलत होते. आमदार डॉ. अतुल भोसले, माजी आमदार आनंदराव पाटील, राष्ट्रीय खनिज विकास महामंडळाचे नवनिर्वाचित सदस्य भरत पाटील, विक्रम पावसकर, रामकृष्ण वेताळ, धैर्यशील कदम आदींची प्रमुख उपस्थिती होती. रवींद्र चव्हाण म्हणाले, भारतात शेजारील देश येत्या काळात अतिरेकी हल्ले घडवून आणतील. त्यांना भारतीय सैन्यदल चोख प्रत्युत्तर देईल. पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि सैन्यदलाच्या पाठीशी सर्वांनी उभे राहिले पाहिजे. देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वामध्ये महाराष्ट्र विकासाच्या प्रत्येक क्षेत्रात पुढे आहे. देशभरात यापुढे कृषी क्षेत्रात तंत्रज्ञानाच्या माध्यमातून बदल होताना दिसतील. पूर्वीच्या कॉंग्रेस विचाराच्या राज्यकर्त्यांनी केवळ 'रोटी, कपडा, मकान' एवढीच आश्वासने दिली. मात्र, त्यांनी सर्वच बाबतीत जनतेच्या तोंडाला पाने पुसली. मोदींनी प्रत्येक गरिबाला घरे, आयुष्मान भारतच्या माध्यमातून मोफत उपचार दिले, केंद्र व राज्य सरकारच्या विविध योजनांच्या माध्यमातून भरघोस निधी दिल्याचे चव्हाण यांनी सांगितले. अहिल्यादेवी होळकर यांच्या तीनशेव्या जयंतीनिमित्त महिला मेळाव्यात १० हजार महिलांना भांडी वाटप करण्यात आली. भाजपत अनेकांनी आज पक्षप्रवेश केल्याबद्दल चव्हाण यांनी समाधान व्यक्त केले. डॉ. अतुल भोसले म्हणाले, अहिल्यादेवी होळकर यांनी सतराव्या शतकात महिलांना स्वायत्तता मिळावी, समान अधिकार मिळावेत, समाजातील त्यांचे स्थान उंचवावे, यासाठी काम केले. त्यांच्या समाजोपयोगी कामाचे अवलोकन करण्यासाठी हा महिला मेळावा घेतला आहे. लाडकी बहीण योजना मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस सरकार असेपर्यंत बंद पडणार नाही.

### अनेकांचा भाजपप्रवेश

कराड तालुक्यातील जखिणवाडीचे माजी सरपंच नरेंद्र पाटील, सरपंच शंकर झिमरे, नांदलापूरचे सरपंच मानसिंग लावंड आदी काँग्रेस व अन्य पक्षातील असंख्य स्थानिक नेते व कार्यकर्त्यांनी मेळाव्यात भाजपप्रवेश केला.

## 'गोकुळ'च्या अध्यक्षपदी हसन मुश्रीफांचे चिरंजीव नाविद यांची निवड

राजेंद्र यादव
कोल्हापूर प्रतिनिधी
दैनिक स्वराज्यदूत

-----------------------



कोल्हापूरमधील गोकुळ दूधसंघाच्या चेअरमनपदी वैद्यकीय शिक्षणमंत्री हसन मुश्रीफ यांचे चिरंजीव नाविद मुश्रीफ यांची निवड झाली आहे. अध्यक्षांची निवड करण्यासाठी सकाळी १० वाजल्यापासून कोल्हापुरात राजकीय खलबतं चालू होती. नाविद यांच्या निवडीसाठी मंत्री हसन मुश्रीफ यांनी व महायुतीने जोरदार मोर्चेबांधणी केली होती. त्यास यश मिळालं आहे. आज कोल्हापुरात गोकुळच्या संचालक मंडळाची बैठक पार पडली. या बैठकीत नाविद मुश्रीफ यांची गोकुळच्या अध्यक्षपदी निवड झाली आहे. महायुतीचाच माणूस गोकुळचा अध्यक्ष व्हायला हवा अशा सूचना स्वतः मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी कोल्हापुरातील महायुतीच्या नेत्यांना दिला होता. त्यानुसार राष्ट्रवादी कॉंग्रेस पार्टीचे (अजित पवार) नेते तथा सरसेनापती संताजी घोरपडे साखर कारखान्याचे चेअरमन नाविद मुश्रीफ यांची गोकुळच्या अध्यक्षपदी निवड झाली आहे. नाविद हे गोकुळ मिल्क युनियनचे संचालक देखील आहेत.

### माजी अध्यक्ष अरुण डोंगळे यांनी राजीनामा देण्यास नकार दिलेला

" मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी गोकुळमध्ये महायुतीचा अध्यक्ष करायचा असल्याने मी गोकुळच्या अध्यक्षपदाचा राजीनामा देणार नाही", असं वक्तव्य गोकुळचे माजी अध्यक्ष अरुण डोंगळे यांनी दोन आठवड्यांपूर्वी केलं होतं. मात्र, गोकुळचे प्रमुख नेते सतेज पाटील (काँग्रेस) व हसन मुश्रीफ (राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी – अजित पवार यांच्याशी डोंगळे यांचे मतभेद असल्याचं अलीकडच्या काळात पाहायला मिळालं होतं. दोन्ही नेत्यांनी डोंगळेंवर, त्यांच्या कामाबाबत नाराजी व्यक्त केली होती. दरम्यान, आता त्यांच्या जागी नाविद मुश्रीफ यांची निवड करण्यात आली आहे. गोकुळमध्ये (कोल्हापूर जिल्हा दूध उत्पादक संघ ) गेल्या अनेक वर्षांपासून आमदार सतेज पाटील व हसन मुश्रीफ यांचा दबदबा आहे. गोकुळचा कारभार या दोन नेत्यांच्या हाती असतो. मुश्रीफ समर्थक अरुण डोंगळे हे गोकुळचे अध्यक्ष होते. मात्र, त्यांची अध्यक्षपदाची दोन वर्षांची मुदत संपल्याने ते १५ मे रोजी संचालक मंडळाच्या बैठकीत राजीनामा देणार होते. मात्र, त्यांनी राजीनामा देण्यास नकार दिला होता. मात्र, मुदत संपल्याने त्यांना राजीनामा द्यावा लागला. दरम्यान, संचालक मंडळाची आज बैठक पार पडली आणि या बैठकीत नव्या अध्यक्षांची निवड झाली आहे.


# शतायुषी हो बाळा..

दैनिक स्वराज्यदूत सादर करीत आहे एक नवीन सदर....

आपल्या चिमुरड्याच्या वाढदिवसाला आम्ही देऊ प्रसिद्धी
फक्त आणि फक्त १५०/ रुपयात... तर मग पाठवा आपल्या
चिमुरड्याचा फोटो आणि शुभेच्छुक यांचे नाव आमच्या नंबरवर
आणि साजरा करा आपल्या चिमुरड्याचा वाढदिवस
दैनिक स्वराज्यदुतच्या लाखो वाचकांसह

आपल्या चिमुकल्याचे वाढदिवसाचे फोटो पाठविण्यासाठी मोबा. नंबर ८४४६६७३६७७


## वैष्णवी हगवणे आत्महत्या प्रकरणात मोठी कारवाई; फरार असलेल्या निलेश चव्हाणला नेपाळमधून अटक

अभिजित कुलकर्णी
पुणे प्रतिनिधी
दैनिक स्वराज्यदूत

-----------------------



पुण्यातील वैष्णवी हगवणे हुंडाबळी प्रकरणातील फरार आरोपी निलेश चव्हाणला अखेर नेपाळमधून अटक करण्यात आली आहे. गेल्या अनेक दिवसांपासून पोलिसांना गुंगारा देणा-या निलेश चव्हाणच्या मुसक्या आवळण्यात पिंपरी-चिंचवड पोलिसांना यश आलं आहे. वैष्णवीच्या आत्महत्येनंतर तिच्या कुटुंबीयांवर दबाव टाकणं, धमकावणं, आणि गुन्हेगारी कृत्यांमध्ये सहभाग असल्याच्या गंभीर आरोपाखाली निलेश चव्हाण फरार झाला होता. या प्रकरणामुळे संपूर्ण शहरात संतापाची लाट उसळली होती. पिंपरी-चिंचवड पोलिसांनी या प्रकरणी विशेष लक्ष केंद्रित करत, एक-दोन नव्हे तर तब्बल ६ शोध पथकं तयार केली होती. सुरुवातीला चव्हाण दुसऱ्या राज्यात लपल्याचा संशय होता, पण गोपनीय माहितीच्या आधारे तो नेपाळमध्ये असल्याचं स्पष्ट झालं आणि पोलिसांनी तातडीने कारवाई करत त्याला अटक केली. लवकरच निलेश चव्हाणला भारतात आणून न्यायालयासमोर हजर केलं जाणार आहे. पोलीस सूत्रांनी दिलेल्या माहितीनुसार, त्याच्याकडून आणखी अनेक महत्त्वाच्या बाबतीत माहिती मिळण्याची शक्यता असून, चौकशीत धक्कादायक खुलासे होण्याची शक्यता आहे. हा गुन्हा केवळ आत्महत्येपुरता मर्यादित नसून, त्यामागे दबाव, छळ आणि गुन्हेगारी साखळी असल्याचा संशय आहे, त्यामुळे पुढील तपास अधिक गंभीर आणि व्यापक होण्याची शक्यता वर्तवली जात आहे.

## महिला आयोग अध्यक्षपद राजीनाम्याच्या प्रश्नावर रुपाली चाकणकरांचं थेट उत्तर, "राजीनामा मागणं ही विरोधकांची भूमिकाच"

अभिजित कुलकर्णी
पुणे प्रतिनिधी
दैनिक स्वराज्यदूत

----------------------



वैष्णवी हगवणे प्रकरणानंतर महाराष्ट्र महिला आयोगाच्या अध्यक्ष रुपाली चाकणकर यांच्यावर राजीनाम्याची मागणी होत असताना त्यांनी अखेर यावर आपली स्पष्ट भूमिका मांडली आहे. त्या म्हणाल्या, " राजीनामा मागणं ही विरोधकांची भूमिकाच असते. पंतप्रधान मोदींपासून गृहमंत्र्यांचा देखील राजीनामा मागितला जातो" . त्या नाशिकमध्ये 'महिला आयोग आपल्या दारी' या उपक्रमाअंतर्गत जनसुनावणीसाठी उपस्थित होत्या. त्या दरम्यान त्यांनी पत्रकारांनी विचारलेल्या अनेक प्रश्नांची उत्तरं दिली.

### "कुटुंब एकत्र ठेवणं हेच आमचं प्रमुख उद्दिष्ट आहे"

रुपाली चाकणकर म्हणाल्या, " कोणत्याही कुटुंबातून आलेल्या तक्रारीकडे आम्ही सामोपचाराने पाहतो. कुटुंब एकत्र ठेवणं हेच आमचं प्रमुख उद्दिष्ट आहे. गैरसमज दूर करून संवाद साधणं आणि कायद्यानुसार तीन वेळा काउन्सिलिंग करणं गरजेचं असतं." त्या पुढे म्हणाल्या की, " कुटुंबव्यवस्था टिकवणं हेच आमचं काम आहे; तोडणं नव्हे, जोडणं गरजेचं आहे."

### परिणय फुके प्रकरणावर स्पष्टीकरण

परिणय फुके प्रकरणासंदर्भात चाकणकर म्हणाल्या की, "या प्रकरणात महिला आयोगाकडे कोणतीही तक्रार प्राप्त झाली नव्हती. मात्र मीडियातून मिळालेल्या व्हिडिओंच्या आधारे नागपूर पोलीस आयुक्तांना पत्र पाठवून आम्ही चौकशीची मागणी केली आहे. पीडित महिलेशी चार ते पाच वेळा संपर्क केला गेला आहे. जेव्हा तक्रार येते, तेव्हा आयोगाकडून कारवाई केली जाते." त्यांनी पुढे स्पष्ट केलं की, " स्थानिक पोलीस स्टेशन, बरोसा सेल आणि कौटुंबिक न्यायालयात तक्रार दिल्यानंतर जर न्याय मिळत नसेल, तर महिला आयोग तुमच्यासाठी आहे. आम्ही सर्व तक्रारी गांभीर्याने घेतो आणि आवश्यक ती कारवाई करतो. तुम्ही पाठपुरावा करा, आयोग तुमच्या न्यायासाठी कटिबद्ध आहे."

## आषाढी वारीपूर्वी कोविड पोहचला सोलापूरात!

### 2 नवे रुग्ण, प्रशासन सतर्क

राजेंद्र यादव
सोलापूर प्रतिनिधी
दैनिक स्वराज्यदूत

------------------------





आषाढी वारीच्या पार्श्वभूमीवर राज्यभरातील वारीतील सहभागींसाठी जय्यत तयारी सुरू असतानाच सोलापूर जिल्ह्यातून चिंता वाढवणारी बातमी समोर आली आहे. माळशिरस तालुक्यातील राऊतनगर-अकलूज आणि माळीनगर येथे दोन कोरोनाबाधित रुग्ण आढळून आल्याने आरोग्य यंत्रणा सतर्क झाली आहे. तालुका आरोग्य अधिकारी डॉ. प्रियांका शिंदे यांनी दिलेल्या माहितीनुसार, सदर रुग्णांना प्रकृती अस्वस्थ वाटू लागल्याने ते खासगी ऐपेक्स आणि ऱ्हीदम हॉस्पिटलमध्ये उपचारासाठी दाखल झाले होते. खाजगी लॅबमध्ये तपासणीनंतर दोघेही कोरोना पॉझिटिव्ह आढळले. यानंतर आरोग्य विभागाने तत्काळ संबंधित कुटुंबातील सर्वांची तपासणी केली. यातील एका रुग्णाने प्रवास केल्याचेही निष्पन्न झाले आहे. कोरोनाचा प्रादुर्भाव वाढू नये म्हणून जिल्हा प्रशासनाने आषाढी वारीच्या तयारीदरम्यान विशेष दक्षता घेण्याचे आदेश दिले आहेत. यासाठी २५,००० रॅट किट्स, १०,००० आरटीपीसीआर ट्यूब्स, १०,००० एन-९५ मास्क, ५०,००० सर्जिकल मास्क, ५०० पीपीई किट्स, १००० सॅनिटायझरच्या बाटल्या आणि १०,००० हॅन्ड ग्लोज मागवण्यात आले आहेत. डॉ. शिंदे यांनी नागरिकांना घाबरून न जाता सावध राहण्याचे आवाहन केले आहे. लक्षणं जाणवली तर तात्काळ जवळच्या आरोग्य केंद्राशी संपर्क साधावा, तसेच ज्या नागरिकांना आधीपासून इतर आजार आहेत त्यांनी मास्क वापरणे, सामाजिक अंतर राखणे आणि लसीकरण पूर्ण करणे अत्यंत गरजेचे आहे, असेही त्यांनी स्पष्ट केले. दरम्यान, महाराष्ट्रात सध्या ४२५ ॲक्टिव्ह रुग्ण असून फक्त मागील २४ तासांत ७६ नवे रुग्ण आढळले. देशात सर्वाधिक रुग्ण केरळमध्ये असून त्यानंतर महाराष्ट्र आणि दिल्लीचा क्रमांक लागतो. दिल्लीमध्ये २६ मेपर्यंत १०४ सक्रिय रुग्ण होते. देशभरात कोरोनाने पुन्हा डोके वर काढल्याने केंद्र आणि राज्यांची आरोग्य यंत्रणा अ‍ॅलर्ट झाली आहे. मुंबई, पुण्यासह विविध जिल्ह्यांत रुग्णसंख्येत वाढ होत असल्याचे लक्षात आल्याने स्थानिक प्रशासनालाही सजग राहण्याचे आदेश देण्यात आले आहेत. नागरिकांनी घाबरून न जाता, खबरदारी बाळगून नियमांचे पालन करावे, असं आवाहन करण्यात आलं आहे.

संपादकीय

# पाणीटंचाई

महाराष्ट्र राज्यात सध्या मान्सूनपूर्व मुसळधार पावसामुळे जनजीवन विस्कळीत झाले आहे. राज्यात दरवर्षी ग्रामीण भागातील नागरिकांना उन्हाळ्यात पाणीटंचाईला सामोरे जावे लागते. पावसाचे पाणी अडविणे किंवा जिरवणे याचा विचार करता यामुळे पर्यावरणाचा समतोल राखला जातो का? याचा विचार होणे आवश्यक आहे. आज ज्या पद्धतीने ग्रामीण भागात नागरिकांना पाण्यासाठी काही ठिकाणी काटकसर करावी लागत आहे. याचा विचार करता पाण्याची बचत ही आजच्या काळाची खरी गरज आहे. यासाठी शासकीय स्तरावर कडक धोरण राबविले गेले पाहिजे. अन्यथा येत्या काही वर्षांत पाणीटंचाईचा प्रश्न अधिक गंभीर होईल. पाण्याबरोबर उन्हाचे सुद्धा चटके सहन करावे लागत आहेत. तेव्हा येत्या पावसाळ्यापासून प्रत्येकांनी आपल्या परिसरात किमान एक झाड लावून त्याचे संगोपन करायला हवे. पाणी अडवणे व जिरवणे ही प्रक्रिया केवळ पाणीटंचाईचे निराकरण करत नाही तर पर्यावरणाचा समतोल राखण्यासही मदत करते. तेव्हा पाणी संवर्धन आणि बचत ही आजच्या काळाची गरज आहे. कारण निसर्गातील पाण्याचा स्रोत टिकवण्यासाठी हा उपाय प्रभावी ठरतो.

१ मे २०२५ रोजी आपल्या महाराष्ट्र राज्याची स्थापना होऊन ६५ वर्षे पूर्ण झाली. प्रगत महाराष्ट्र घडविण्यासाठी शासन कटिबद्ध झाले आहे. मात्र राज्यात पाण्याचा प्रश्न अजूनही सुटलेला नाही. राज्यात पाणी अडवा पाणी जिरवा, पाण्याची बचत करा असे जरी सांगत असू तरी पाणीटंचाईची कारणे समजून घेणे गरजेचे आहे. असे जर मागील ६५ वर्षांत झाले असते तर आज राज्यातील विशेषत: ग्रामीण भागातील नागरिकांना पाणीटंचाईची वेळ आली नसती. याची सरकारने गंभीर दखल घेणे गरजेचे आहे.

सिनेअभिनेते नाना पाटेकर व मकरंद अनासपुरे यांनी महाराष्ट्रातील दुष्काळी भागांमध्ये आत्महत्याग्रस्त शेतकऱ्यांच्या कुटुंबीयांना मदत करण्यासाठी 'नाम फाऊंडेशन' या धर्मादाय संस्थेची स्थापना केली. परंतु पाण्यासाठी सुद्धा या धर्मादाय संस्थेने राज्यात पुढाकार घेतला आहे. ही समाधानाची बाब असली तरी लाखो रुपये खर्च करून सुद्धा वस्तीत पाणी आलेले नाही याचाही विचार होणे आवश्यक आहे.

कोकणातील ग्रामीण भागात १९९४ पर्यंत पाण्याचा प्रश्न आला नव्हता. त्यावेळी काही ठिकाणी पावसाळी, हिवाळी व उन्हाळी शेती केली जात असे. व्हाळाला बांध बांधून, पाटाने पाणी आणून शेती केली जात असे. मी सुद्धा पाटाच्या पाण्यावर शेती केली आहे.

आता मात्र परिस्थिती वेगळी दिसते. पूर्वी माती व झाडाच्या फांद्याच्या साहाय्याने पाणी अडवले जात होते. आता मात्र लाखो रुपये खर्च करून सिमेंटचे बंधारे बांधले जात आहेत. मात्र ऑक्टोबर/नोव्हेंबर महिन्यामध्ये धरणे कोरडी दिसतात. याला जबाबदार कोण? आपणच ना..! त्यावर योग्य प्रकारे तज्ञ व्यक्तीच्या मार्फत शोध लावणे गरजेचे आहे. असेच जर चालले तर उद्या पाण्यासाठी काय करावे लागेल याचा सुद्धा विचारविनिमय करायला हवा.

अलीकडच्या काळात राज्यात उन्हाळ्यामध्ये पाणीटंचाईची परिस्थिती का निर्माण होते. याचा विचार होणे आवश्यक आहे. त्यासाठी राज्यातील पाणीटंचाईवर संशोधन होणे गरजेचे आहे. म्हणजे पाणीटंचाईवर योग्य उपाय सुचविता येतील. अजून पाण्यासाठी एक महिना महत्त्वाचा आहे. आता जरी पाऊस पडत असला तरी जून महिन्यामध्ये पाऊस पडेलच याची शाश्वती नाही. तेव्हा आतापासून पाणी जपून वापरावे लागेल. खेड्यात दोन ते तीन दिवसांनी अर्धा तास पाणी येते. त्यामुळे पुढील दिवशी पाणी येईपर्यंत पाण्याचा साठा नागरिक करून ठेवत आहेत. मात्र हे भविष्याच्या दृष्टीने घातक आहे. त्यात रोजगारचा प्रश्न त्यामुळे खेड्यातील लोक जास्त उदासीन दिसत आहेत. कारण आरोग्यासाठी पाणी महत्त्वाचे असते. आजही ग्रामीण भागात स्वच्छ पाण्याचा अभाव दिसून येतो. तेव्हा लोक पाणी गाळून नंतर उकळून पितात.

आता आपल्याला पाणीटंचाईची अनेक कारणे सांगता येतील. परंतु पाणीटंचाईच्या प्रमुख कारणांचा अभ्यास केल्यास त्याचे प्रमुख कारण म्हणजे राज्यातील वाढती लोकसंख्या. त्यामुळे पाण्याचा जास्त प्रमाणात वापर केला जात असून त्यात मोठ्या प्रमाणात पाण्याचा गैरप्रकार होत आहे. औद्योगिकीकरणाच्या नावाखाली झाडांची होत असलेली कत्तल आणि वाढते शहरीकरण त्यामुळे पाण्याची पातळी खालावली आहे. तसेच शेती, घरगुती वापरासाठी पाणी आणि उद्योगासाठी बऱ्याच ठिकाणी पाण्याची पातळी खाली गेलेली दिसत आहे. याचा परिणाम राज्यात बऱ्याच विहिरी उन्हाळ्यात कोरड्या पडताना दिसत आहेत. याला आधार म्हणून राज्यात पाणी अडवा, पाणी जिरवा संकल्पना राबवली जात आहे. मात्र त्याचा फारसा प्रभाव दिसून येत नाही. यात बऱ्याच प्रमाणात शासकीय अनुदान खर्च होत आहे.

नदीनाल्यात पाणी अडविले जात आहे. त्याचा फायदा स्थानिक नागरिकांना काही प्रमाणात झालेला दिसून येत असला तरी दूर वरच्या नागरिकांना पाणीटंचाईला सामोरे जावे लागत आहे. यात पाळीव जनावरांचे सुद्धा हाल होत आहेत. सर्व सजीव जीवांसाठी पाणी हे एक अनमोल संसाधन आहे. त्याचा योग्य प्रकारे वापर केला पाहिजे. यासाठी शासकीय पातळीवर नि:पक्षपातीपणे नियंत्रण ठेवायला हवे. तसेच शासकीय अनुदानाचा योग्य वापर केला पाहिजे. तरच भविष्यात राज्यातील नागरिकांना पाणीटंचाईला सामोरे जाण्याची वेळ येणार नाही.

# ह भ प श्री सोमनाथ महारु नेरे वसमार हे ज्येष्ठ वारकरी पुरस्काराने सन्मानित

श्री संजय बच्छाव
धुळे जिल्हा प्रतिनिधी
दैनिक स्वराज्यदूत



साक्री तालुका वसमार येथील येथील ह भ प श्री सोमनाथ मोहरू नेरे यांना ज्येष्ठ वारकरी सेवा पुरस्कार देऊन धुळे येथे नुकतेच सन्मानित करण्यात आले. एक साधा भोळा पांडुरंगावर आभार भक्ती प्रेम करणारे सोमनाथ माऊली हे अनेक वर्षापासून पंढरीची पाईवारी नित्यनेमाने करत आहेत तसेच त्र्यंबकेश्वरची वारी सुद्धा न चुकता करतात तालुक्यात असो वा जिल्ह्यात कुठेही कीर्तनाचा कार्यक्रम असो किंवा वारकरी संप्रदायाच्या कुठलाही कार्यक्रम सोमनाथ माऊली हे आवर्जून उपस्थित राहतात त्यांच्याच या कामाची दखल घेऊन कान्हादेश वारकरी सेवा मंडळाने त्यांना पुरस्कार देऊन एका खऱ्याखुऱ्या व साध्या भोळया वारकऱ्याला सन्मानित करून त्यांच्या आयुष्यात एक मानाचा तुरा रोवला. पुरस्काराचे स्वरूप सन्मानचिन्ह, मानपत्र, शाल, श्रीफळ. कहानदेश वारकरी सेवा मंडळाच्या वतीने २०२४- २५ वर्षातील ज्येष्ठ वारकरी सेवा पुरस्कार वितरण सोहळा धुळे येथे संपन्न झाला. धुळे आमदार श्री अनुप अग्रवाल, भाजपा अध्यात्मिक आघाडी अध्यक्ष तुषार भोसले नागाई संस्थांचे मठाधिपती प्रणव गिरीजी बाबाजी कान्हादेश वारकरी सेवा मंडळ यांच्या उपस्थितीत पुरस्कार प्रदान करण्यात आला. यावेळी उपस्थित कहानदेश वारकरी सेवा मंडळ धुळे, साक्री तालुका वारकरी सेवा मंडळ, वसमार भजनी मंडळ, तसेच त्यांचे गुरुबंधू कान्हादेश साक्री तालुका अध्यक्ष श्री उमेश भाऊसाहेब यांनी अभिनंदन करून पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या. तसेच साक्री तालुक्यातील माऊली प्रतिष्ठानचे सर्व गुरु बंधू व त्यांचे मित्र यांच्याकडून शुभेच्छांचा वर्षाव होत आहे.

# डॉ. किरण सावे हे डिजिटल मिडियाच्या "महाराष्ट्र महागौरव" पुरस्काराने सन्मानित

संतोष मोहिते
विशेष प्रतिनिधी
दैनिक स्वराज्यदूत



महाराष्ट्र महागौरव पुरस्कार स्वीकारताना प्राचार्य डॉ. किरण सावे, ना. चंद्रकांत दादा पाटील, मंत्री, उच्च व तंत्रशिक्षण, डॉ. ओम प्रकाश शेटे, अध्यक्ष, आयुष्मान भारत मिशन, सरिता कौशिक, संपादिका, ए.बी.पी. माझा, राजा माने, संस्थापक अध्यक्ष, डिजीटल मिडिया

डिजिटल मिडिया संपादक आणि पत्रकार संघटना, महाराष्ट्र यांच्यातर्फे देण्यात आलेला मानाचा महाराष्ट्र महागौरव पुरस्कार सोनोपंत दांडेकर महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. किरण सावे यांना प्राप्त झाला आहे. महाराष्ट्रातील विविध भागांमध्ये विविध क्षेत्रात निस्पृहपणे आणि निस्वार्थीपणे सामाजिक आणि शैक्षणिक क्षेत्रात भरीव कार्य करणाऱ्या काही मोजक्या व्यक्तिमत्वांची या संघटनेतर्फे निवड करण्यात आली. जेडब्ल्यू मॉरिएट, पुणे येथे महाराष्ट्र राज्याचे उच्च व तंत्रशिक्षण मंत्री मा. ना.चंद्रकांत दादा पाटील, आयुष्मान भारत मिशनचे अध्यक्ष डॉ. ओमप्रकाश शेटे या नामवंतांच्या हस्ते डॉ. किरण सावे यांना महाराष्ट्र महागौरव पुरस्कार देऊन सत्कार करण्यात आला. सदर सोहळ्याला महाराष्ट्राचे ग्रामविकास मंत्री माननीय नामदार जयकुमार गोरे, ए बी पी माझाच्या संपादिका,सरिता कौशिक, डिजीटल मिडिया पत्रकार संघटनेचे संस्थापक अध्यक्ष राजा माने, या कार्यक्रमाला आवर्जून उपस्थित होते. 'सदर सन्मान माझ्या सोनोपंत दांडेकर शिक्षण संस्थेचा, माझ्या सहकाऱ्यांचा आणि इथल्या परिसराचा आहे' असे मत डॉ. किरण सावे यांनी व्यक्त केले आहे. यापूर्वी अनेक मानाच्या सन्मानासोबत डॉ. किरण सावे यांना मुंबई विद्यापीठाचा आदर्श शिक्षक पुरस्कार प्राप्त झाला आहे.




# समाजसेवेचा गोरक्षणाचा वसा घेतलेले अष्टपैलू व्यक्तिमत्व: तात्यासो एन. झेड. देवरे

श्री संजय बच्छाव
धुळे जिल्हा प्रतिनिधी
दैनिक स्वराज्यदूत



साक्री तालुक्यातील जेबापूर येथील रहिवासी असलेले निंबाजी झिपरू देवरे निवृत्त शाखा अभियंता संपूर्ण धुळे जिल्ह्यात सुप्रसिद्ध असलेले देवरे कुटुंब. आयुष्यभर कष्ट करून जंगलामध्ये मुक्कामी राहून तापी खिल्लारी गाईचे वीस ते पंचवीस वर्ष सांभाळणारे गोसेवक कै. बापूजी दिगंबर पुंजू देवरे यांचे सुपुत्र श्री एन झेड देवरे उर्फ तात्या आज ७१ व्या वर्षात पदार्पण करीत आहेत. एका सर्वसाधारण कुटुंबात एका "हिऱ्याचा" जन्म झाला ते म्हणजे निंबाजी तात्या. निंबाचे झाड जसे सर्व सृष्टीला जीव जंतूला ऑक्सिजन देऊन जगवतो, छाया देतो तसेच निंबाजी तात्या सुद्धा गोरगरिबांना मदत करत असतात त्यांच्या छायेत सहवास देतात आपल्या मित्र परिवारासाठी रात्री धावून जाणारे समाजसेवक, माणुसकीचा झरा असलेले दिलदार व्यक्तिमत्व. निंबाजी तात्या एक उच्चशिक्षित इंजिनीयर व्यक्तिमत्व असून सुद्धा शेतीची व गोमातेची सेवा करण्याची आवड गेल्या ४० वर्षापासून तापी खोऱ्यात खिल्लार गाईचे संगोपन करीत आहेत. तसेच निसर्गप्रेमी तात्यांनी आपल्या कार्यकाळात हजारो वृक्ष लागवड केली व पाण्याच्या संगोपनासाठी प्रत्येक गाव खेड्यात पाझर तलाव बांधून जलसाठे तयार केले. त्यांच्या या चांगल्या कामाची प्रशासनाने दखल घेऊन तात्यांना उत्कृष्ट अभियंता पुरस्कार देऊन सन्मानित केले आहे. तात्यांनी आपली नोकरी सांभाळत मुलांना सुद्धा उच्चशिक्षित इंजिनीयर केले व विदेशात नोकरीला लावले. त्यांनी नोकरी सांभाळून आपल्या शेतीची नाळ कधी तुटू दिली नाही स्वतः:च्या स्व कष्टाने साक्री तालुक्यात शंभर एकरच्या वर बागायत शेती तयार केली. त्यांच्या या उत्तुंग भरारीला धर्मपत्नी माईसाहेब यांचा मोठा सिंहाचा वाटा आहे. अशा या दिलदार व्यक्तिमत्त्वाला वाढदिवसाच्या हार्दिक शुभेच्छा.

शब्दांकन: श्री अविनाश खैरनार कासारे.

# प्रितेश फुलडाळे यांचे शिरूर बस स्थानकातील समस्यांवर 'खड्ड्यात झोपून' आंदोलन

फिरोज सिकलकर
शिरूर प्रतिनिधी
दैनिक स्वराज्यदूत

--------------------------

शिरूर बसस्थानकातील अनेक वर्षांपासून प्रलंबित असलेल्या मूलभूत सुविधांचा अभाव खराब व्यवस्थापन, अनियमित सेवा आणि प्रशासनाच्या निष्काळजीपणा विरोधात सामाजिक कार्यकर्ते प्रितेश फुलडाळे यांनी एक आगळंवेगळं आंदोलन करत जनतेचे आणि प्रशासनाचे लक्ष वेधून घेतले. बसस्थानकासमोरील रस्त्यावर असलेल्या खड्ड्यात प्रत्यक्ष झोपून त्यांनी आंदोलन सुरू केले, ज्यामुळे हे आंदोलन शहरभर चर्चेचा विषय ठरले.



पूर्वीच्या आश्वासनांची पूर्तता न झाल्याचा निषेध

या आधीही प्रितेश फुलडाळे यांनी बसस्थानकाच्या प्रश्नावर बेमुदत उपोषण केले होते. त्या वेळी पुणे विभागीय वाहतूक अधिकारी कमलेश धनराळे, आगार व्यवस्थापक मनिषा गायकवाड, स्थानक प्रमुख भैरवनाथ दळवी, तसेच स्थानिक नागरिक यांच्या उपस्थितीत बैठक झाली होती.

त्या बैठकीत पुढील आश्वासने दिली गेली होती.

१० दिवसांत समस्यांचे निवारण

पुढील महिन्यात शिरूर आगाराला १० नवीन बसेस

मात्र, कोणतीही ठोस कृती न झाल्याने संतप्त होत फुलडाळे यांनी पुन्हा आंदोलन छेडले.

नवीन आंदोलनानंतर प्रशासनाची बैठक व ताज्या आश्वासनांची यादी

प्रशासनाने पुन्हा एकदा आंदोलकांशी चर्चा करत पुढील उपाययोजना करण्याचे लेखी आश्वासन दिले:

प्रमुख निर्णय व आश्वासने –

पिण्याच्या पाण्याची व्यवस्था स्वच्छतागृहाजवळ असलेली पिण्याच्या पाण्याची जागा बदलून नवीन ठिकाणी आरो प्लांट बसवण्यात येणार असून हे काम महिनाभरात पूर्ण होईल.

बसस्थानकातील आतील रस्त्याची दुरुस्ती

पुढील दोन महिन्यांत पूर्ण केली जाणार.

शिरूर आगारासाठी नवीन बसेस

लवकरच ५ नवीन बसेस शिरूर आगारात दाखल केल्या जातील.

बस मार्गात बदल –

पुणे– अहिल्यानगर बाह्यमार्गाऐवजी थेट शिरूर बसस्थानकातून बस ये-जा करतील. याबाबत लवकरच सूचना दिल्या जातील.

पोलीस बंदोबस्त

बसस्थानक परिसरातील सुरक्षेसाठी पोलीस बंदोबस्त ठेवण्यासंबंधी पत्रव्यवहार सुरू करण्यात आला येईल

खाजगी वाहन पार्किंगवर कारवाई –

स्थानकात होणाऱ्या अनधिकृत खाजगी वाहन पार्किंगवर नियंत्रण ठेवण्याबाबत सूचना दिल्या जातील.

कचरा व्यवस्थापन

बसस्थानकातील कचऱ्याची योग्य विल्हेवाट लावण्यासाठी स्वतंत्र व्यवस्था केली जाणार.

पाण्याच्या बाटल्यांचे दरफलक

स्थानकात मिळणाऱ्या " नाथजल" पाण्याच्या बाटल्यांचा दर

१५ रुपयेअसलेला फलक लावण्यात येईल.

प्रवेशद्वार व गार्डनजवळ लाईट

प्रवेशद्वाराजवळ लाईट बसवण्यात येणार, जेणेकरून रात्री अंधाराची समस्या दूर होईल.

सी एन जी पंपाबाबत माहिती

आगारातील सी एन जी पंपाच्या प्रगतीची माहिती अधिकृतरित्या देण्यात येणार.

ग्रामीण भागातील एस.टी.साठी स्वतंत्र फलाट ही मागणी प्रशासनाने मान्य केली. असून त्यासाठी आवश्यक तयारी केली जाणार आहे.

आंदोलनात विविध पक्ष व संघटनांचा सक्रीय सहभाग

या आंदोलनात प्रितेश फुलडाळे यांच्यासोबत अनेक सामाजिक संघटना व राजकीय पक्षांचे प्रतिनिधी सहभागी झाले होते. या वेळी, अनिल बांडे, ॲड.सुभाष जैन, ॲड.रवींद्र खांडरे , प्रिया बिरादार, भाजपचे शहर चिरणीसविजय नरके, , राजेंद्र शहाणे, रणदिवे मामा, डॉ. वैशाली साखरे, अविनाश घोगरे, भाजपचे चिटणीस राजेंद्र महाजन, शंकर चाबुकस्वार, सोहेल शेख, शांतीलाल नहार, बाळासाहेब तातेड, अशोक गुळादे, सावळेराम आवारी,सविता बोरुडे, कोमल भणगे, हीना शेख, प्रीती बनसोडे, सुधीर कडेकर, सर्फराज शेख अनेक सामाजिक कार्यकर्ते व महिला सहभागी झाले होते.

# ३१ मे जागतिक तंबाखू निषेध दिवस

## सावधान! तंबाखू, खैनी, गुटखा, खर्रा खाने "घातकच" परंतु खावुन थुंकणे "महाघातक"

संपूर्ण जगातील लोकांना तंबाखू पासून मुक्ती मिळावी व आरोग्य सुदृढ रहावे या उद्देशाने तंबाखू व धुम्रपान यापासून होणारा त्रास दुर करण्याकरीता तंबाखू निषेध दिवस साजरा केल्या जातो.जागतिक आरोग्य संघटना डब्लुएचओच्या सदस्य देशांनी तंबाखू सेवनाने होणाऱ्या बिमारीचा मृत्यू दरात वाढ झाल्यामुळे १९८७ ला महामारी घोषीत करण्यात आली व तंबाखू निषेध दिवस साजरा करण्याचा सल्ला देण्यात आला.८ एप्रिल १९८८ ला डब्लुएचओने वर्षगाठ साजरी केली व याच दिवशी ३१ मे तंबाखू निषेध दिवस साजरा करण्याची घोषणा केली. तेव्हापासून ३१ मे जागतिक तंबाखू निषेध दिवस साजरा केल्या जातो.डब्लुएचओने तंबाखू सेवनाने होणाऱ्या २५ प्रकारच्या शारीरिक बिमाऱ्या पहाता व ४० प्रकारचे कैंसर पहाता आणि या बिमारीचा वाढता मृत्यू दर पहाता याला महामारी घोषीत केली.डब्लुएचओच्या माहिती नुसार जगात तंबाखूने किंवा धुम्रपान केल्याने दरवर्षी ८० लाखांपेक्षा जास्त लोकांना आपले प्राण गमवावे लागतात.यावर जगातील देशांनी नियंत्रण ठेवले नाही तर मृत्यूचा आकडा दुप्पटीने वाढु शकतो. कोणत्याही नशेली पदार्थाचे अती सेवन करणे म्हणजे मृत्यूला कवटाळले होय.मानवाची जगण्याची दशा,दीशा ठरवीने हे मानवाच्या मनावर व हातामध्ये असते. परंतु आपल्या मनावरचा ताबा सोडून नशेली पदार्थाचे सेवन केले तर स्वत:ला व परीवाराला घातक सीध्द होवु शकते याला नाकारता येत नाही. तंबाखूच्या सेवनाने कॅन्सर सारखे महाभयानक आजाराने मानुस जखडतो आणि यांचा दुषपरीणाम संपूर्ण परीवाराला भोगावा लागतो.ह्याबाबी मानवाने स्वत: समजुन घ्यायला हव्यात.कोणत्याही नशेच्या बाबतीत सरकारचे दुटप्पी धोरण आपल्याला पहायला मिळते.सरकार नशेली वस्तुची खुलेआम विक्री करण्यास प्राधान्य देते व मोठ्या प्रमाणात परवाने सुध्दा देते आणि दुसरीकडे नशा न करण्याचे आव्हान करते याला कोणते धोरण म्हणावे? मध्यंतरी महाराष्ट्रत दारू-वाईन किराणा दुकान विक्रीला ठेवता येईल या चर्चेला मोठे उधाण आले होते.या चर्चेचा सर्वच स्तरातून निषेध करण्यात आला. त्यामुळे ताबडतोबच या चर्चेवर पुर्णविराम लागला. सरकारने नशाबंदीचे मोठ-मोठे सरकारी ऑफिसेस खोललेली आहेत. याकरीता देशभरात लाखो कर्मचारी कार्यरत असतात. याव्यतीरीक्त अनेक रजिस्टर्ड सामाजिक संस्था व्यसनमुक्तीसाठी कार्य करतांना दीसतात.परंतु सरकार स्वत:हुन नशेली पदार्थाचे उत्पादन बंद करायला तयार नाही. कारण नशेली(मद्द, तंबाखू, खैनी, सिगारेट, बिडी, गुटखा,गांजा इत्यादी) वस्तुपासुन राज्य व केंद्र सरकारला मोठ्या प्रमाणात महसूल (रेव्हेन्यू) मिळत असतो व त्यावर सरकारचा कारभार चालतो.यावरून स्पष्ट होते की सरकार पैसा कमविण्याकरीता दुटप्पी धोरण अवलंबुन मानवाचा जीव धोक्यात टाकत आहे. कोव्हीड-१९ च्या महामारीच्या काळात संपूर्ण भारतासह अनेक राज्यांमध्ये लॉकडाउन होता याकाळात दारूची दुकाने खोलण्याची मागणी सर्व प्रथम राजकीय पुढाऱ्यांची होती आणि अनेक राज्यांमध्ये लॉकडाउनच्या काळात दारूची दुकाने खोलण्यात आली.यामुळे सरकारच्या तिजोरीत करोडो रुपयांचा महसूल रूपात पैसा जमा झाला.यावरून स्पष्ट होते की पैशासाठी सरकार लोकांना व्यसनाधीन करीत आहे. लॉकडाउनच्या काळात दारू, सिगारेट, बीडी, तंबाखू, खैनी, गुटखा,खर्रा,गांजा याचा मोठ्या प्रमाणात तुटवडा होता ह्या वस्तु अवैधरीत्या दुप्पटीने किंवा तिपटीने लोकांनी घेतल्या परंतु नशासोडण्याला कोणीही महत्त्व दिले नाही. लॉकडाउनच्या काळात लोकांना नशा सोडण्याची सुवर्णसंधी होती.परंतु नशेली वस्तुंची दुकाने खुलताक्षणी सोशल डिस्टिंक्शनची धज्जीया उडवून नशेली वस्तु घेण्याकरिता ३ कीलो मिटर पर्यंत लोक रांगेत उभे होते.अशाने कोणत्याही नशेवर आळा बसणार नाही.प्रत्येकानी जर आपल्या मनावर ताबा ठेवला तर कोणीही नशेच्या आहारी जावु शकत नाही.कोणतीही नशा असो ती घातकच असते. परंतु अती नशा मृत्यूच्या खाईत नेल्या शिवाय रहाणार नाही.याला म्हणतात"अती तिथे माती". त्यामुळे कोणतीही नशा करतांना सावधगिरी बाळगली पाहिजे.अन्यथा जिवीत हानी अटळ आहे. तंबाखू, गुटखा,खैनी,खर्रा, सुपारी, दारू यापासून शरीराच्या कोणत्याही अवयवांच्या विकासासाठी चालना देत नाही मग या वस्तूचे सेवन का करावे? कोणतीही नशा असो ती शरीराचा विकास तर करीत नाहीच हालाकी शरिराला "छल्ली" व छिन्नविछिन्न करण्याचे काम करीत असते व स्लोपॉयझनचे काम करून मृत्युला जवळ करीत असते.आपण साधारणतः नशेली वस्तू व पोषक वस्तू यांचा विचार केला तर मनुष्यासाठी नशेली वस्तूंच्या तुलनेत पोषक वस्तू खुपचं स्वस्त असतात.उदाहरण द्यायचे झाले तर बादाम १००० रूपये किलो यांच्या तुलनेत गुटखा ४४०० रूपये किलो, शुद्ध तुप ६०० रूपये किलो यांच्या तुलनेत तंबाखू १७०० रूपये किलो, सफरचंद१०० रूपये किलो यांच्या तुलनेत सुपारी ६०० रूपये किलो,दुध ५० रूपये लिटर यांच्या तुलनेत दारू ६०० रूपये लिटर अशा प्रकारे अशा अनेक पोष्टीक वस्तू आहेत की त्यांची किंमत नषेली वस्तू पेक्षा कितीतरी पटीने स्वस्त व कमी आहेत.परंतु नशा करणारे बहाद्दर नशेला जास्त महत्त्व देतात हे त्यांचे दुर्भाग्य म्हणावे लागेल.कोव्हीड-१९ च्या महामारी पासून सरकारने रस्त्यावर थुंकण्यावर बंदी घातली होती त्याचप्रमाणे सरकारने तंबाखू, गुटखा,खैनी, खर्रा,गांजा यावर सुध्दा बंदी घालायला पाहिजे होती.यामुळे मृत्यू दर कमी होण्यास मोठी मदत होईल. करोना काळात कोरोना महामारीचा प्रकोप दीवसेंदीवस वाढत असतानाच केंद्रशासित प्रदेशासह २८ राज्यांनी तंबाखू व धुम्रपानामुळे कोरोणाची लागन होण्याची शक्यता पहाता. त्यातच फुफ्फुसाचा कर्करोग होतो किंवा रोगप्रतिकारक शक्ती कमी होते असे आरोग्य तज्ञांचे म्हटले होते.या पार्श्वभूमीवर तंबाखू, गुटखा, खैनी, खर्रा सेवन आणि सार्वजनिक ठिकाणी थुंकण्यावर बंदी घालने उचीत होते तीच पद्धत नेहमीसाठी सरकार कडून अमलात यायला हवी.सध्याच्या परीस्थितीत युवापिढी "धुम्रपानाच्या"आहारी जातांना दिसत आहे.त्यांनी मनावर ताबा ठेवुन धुम्रपानाचा विरोध करावा व युवकांनीच जगाला संदेश देवुन धुम्रपानाचा निषेध केला पाहिजे. कोणत्याही नशेली वस्तुंसाठी रांगेत उभे रहाने म्हणजे "मृत्यूच्या रांगेत"उभे रहाल्यासारखे आहे.याची जानीव आजच्या युवा पिढीने लक्षात ठेवली पाहिजे.सरकारने कीतीही नशेली वस्तु विकण्याचा प्रयत्न केला तरीही आपण जर आपल्या मनावर ताबा ठेवला तर कोणतीही नशेली वस्तु तुम्हाला स्पर्श सुध्दा करू शकत नाही हेसुद्धा तेवढेच सत्य आहे.त्यामुळे सध्याच्या परिस्थितीत कोणीही रस्त्यावर तंबाखू,खर्रा किंवा इतर नशेली वस्तू थुंकु नये याची काळजी घ्यायला हवी.कारण रस्त्यावर थुंकल्याने अनेक बिमाऱ्यां व संक्रमनात मोठ्या प्रमाणात वाढ होवून आरोग्य धोक्यात येऊ शकते.त्यामुळे कोणत्याही नशेपासुन सावधगिरी बाळगली पाहिजे.आपण सुदृढ रहालो तर आपली पिढी सुदृढ राहील" त्याचप्रमाणे "आपण सुरक्षीतरीत्या जगलो तर तर देश सुरक्षित राहील, देश सुरक्षित रहाला तर जग अवश्य सुरक्षित होईल.त्यामुळे तंबाखू खर्रा खावुन रस्त्यावर थुंकु नका व कोणत्याही महामारीला जाहीर आमंत्रण देवु नका ही माझी आग्रहाची आणि कळकळीची विनंती आहे.याकरीता तंबाखू निषेध दिनाच्या निमित्ताने आपण"संकल्प"करूया की यानंतर धुम्रपान व इतर नशेली वस्तूला टाटा-बाय-बाय करू या.

------------------------------

लेखक
रमेश कृष्णराव लांजेवार
नागपूर

# विकसित कृषि संकल्प अभियानांतर्गत माफसू तर्फे विविध कार्यक्रमाचे आयोजन

## शेतकऱ्यांनी लाभ घेण्याचे आवाहन : कुलगुरु डॉ नितीन पाटील

राजेश धुमाळ
नागपूर प्रतिनिधी
दैनिक स्वराज्यदूत

----------------------




कृषि व शेतकरी कल्याण मंत्री, भारत सरकार अंतर्गत भारतीय कृषि अनुसंधान परिषदेतर्फे देशभरात २९ मे ते १२ जून दरम्यान संपूर्ण देशात 'विकसित कृषि संकल्प अभियान' राबविण्यात येत आहे. आज २९ मे २०२५ रोजी महाराष्ट्र पशु व मत्स्य विज्ञान विद्यापीठ, नागपूरचे कुलगुरु मा. डॉ. नितीन पाटील यांच्या शुभहस्ते विद्यापीठ परिसरात कृषि रथास हिरवी झेंडी दाखवून या अभियानाचा शुभारंभ करण्यात आला. या कार्यक्रमाचा जास्तीत जास्त शेतकऱ्यांनी लाभ घ्यावा, असे आवाहन माफसूचे कुलगुरु मा. डॉ. नितीन पाटील यांनी केले आहे. या प्रसंगी अभियानाचे विद्यापीठ समन्वयक तथा संचालक विस्तार शिक्षण डॉ. अनिल भिकाने, संचालक शिक्षण तथा अधिष्ठाता पशुविज्ञान डॉ. शिरीष उपाध्ये, संचालक संशोधन डॉ. नितीन कुरकुरे, अधिष्ठाता मत्स्यविज्ञान व निम्नशिक्षण डॉ. सचिन बोंडे, नागपूर पशुवैद्यक महाविद्यालयाचे सहयोगी अधिष्ठाता डॉ. आरजु सोमकुवर, कृषि महाविद्यालय नागपूरचे सहयोगी अधिष्ठाता डॉ. व्ही. जी. अतकरे प्रामुख्याने उपस्थित होते. या अभियानांतर्गत माफसू तर्फे विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले. विद्यापीठांतर्गत नागपूर, सांगली व ठाणे येथील तीन कृषि विज्ञान केंद्रातर्फे प्रत्येकी दोन टिम च्या माध्यमातून २७० गावात तसेच विद्यापीठाने उन्नत भारत अभियानांतर्गत दत्तक घेतलेल्या ३० गावांत हे अभियान राबविण्यात येणार आहे. या व्यतिरिक्त माफसूचे ३४ शास्त्रज्ञ ३४ जिल्ह्यात विविध कृषि विज्ञान केंद्राच्या चमूमध्ये तज्ञ मार्गदर्शक म्हणून आधुनिक पशु व मत्स्य क्षेत्रातील तंत्रज्ञानाबाबत शेतकऱ्यांना मार्गदर्शन करणार आहेत. या अभियानांतर्गत गावामध्ये जाऊन शेतकऱ्यांमध्ये कृषि व संलग्नित विषयांबाबत जागरुकता निर्माण केली जाणार आहे. या अनुषंगाने सदरील अभियानांतर्गत सर्व शास्त्रज्ञ व अधिकारी गावांमध्ये उपस्थित राहुन कार्यक्रम घेतील. या अभियानात भारतीय अनुसंधान परिषदेतील शास्त्रज्ञ तसेच माफसू व कृषि विद्यापीठातील तज्ञ मार्गदर्शन करणार आहेत. कृषि विज्ञान केंद्र हे आत्मा व राज्य शासनाच्या कृषि विभागाच्या मदतीने कार्यक्रम आयोजित करणार आहेत. कृषि विज्ञान केंद्र, दुधबर्डी, नागपूरचे वरिष्ठ शास्त्रज्ञ व प्रमुख डॉ. सारीपुत लांडगे यांच्या नेतृत्वात कृषि महाविद्यालय नागपूरचे डॉ. आर. खोब्रागडे, डॉ. धनराज मानकर, सेंट्रल इन्स्टिट्यूट फॉर कॉटन रिसर्च, नागपूरचे डॉ. रामकृष्ण आणि डॉ. संथी, सेंट्रल इन्स्टिट्यूट फॉर रिसर्च ऑन कॉटन टेक्नालॉजी, मुंबईचे डॉ. षणमुगम, नागपूर पशुवैद्यक महाविद्यालयातील डॉ. किशोर राठोड, डॉ. गजानन अंबोरे, डॉ. शायनी जॉय, डॉ. शेखर बढे, डॉ. क्रांती खारकर, डॉ. श्वेता लेंडे यांच्यासह पदव्युत्तर विद्यार्थी डॉ. ओम भारवडे आणि डॉ. अदिती जिद्देवार या अभियानाच्या यशस्वितेकरीता कार्य करणार आहेत.

# - पुण्यश्लोक -

पुकारा करीतो,या रणभूमीवर,
जिच्या न्यायाची गाथा अंबरावर।
धर्मरक्षक ती,प्रजाहितकारी,
अहिल्याबाई होळकर, महाराणी सारी!
सतरा शतक उजळून निघाले,
माळव्यात तेजाचं ज्वाळा पेटले,
पुरुषांहून पुढे झेप घेणारी,
होळकरीण रणराणी तेजोमयी भारी!
धर्मस्थळांची केली उभारणी,
काशी-गया-पंढरी सजली पुन्हा वारी,
काशी विश्वनाथ उजळून टाकी,
अहिल्याबाईंची दानशूरता अमर
गाथा बाकी!
न्यायधर्म हा होता जीवाचा श्वास,
गरिबांच्या अश्रूंना मिळे तिचा वास,
राज्य नाही, ती होती एक माऊली,
दारीदारी जाई, न थांबे कधी पाऊली!




विठोबाच्या पायांशी होती सेवा,
संतविचारांवर तिचा गाभा ठेवा,
राजकारण नाही, धर्मकारण तीचं,
होळकर घराण्याचं गौरव तीचं!
नाही कधी सोन्याचे हिरे हवे,
पण जनतेचे सुख पाहिजे सवे,
स्त्रियांच्या हक्कांची होती ती ढाल,
शौर्य अन् ममता — एकाच काळ!
अंधश्रद्धेवर चालवली तलवार,
शिकवली बुध्दी, न घ्या कोणताही भार,
सामर्थ्य असो की स्वाभिमानाचा गंध,

अहिल्याबाईंचा धर्म हेच तिचं छंद!
आजही जर गर्जावा महाराष्ट्रात,
तर नावे घ्यावी त्या रणमातेंच्यात,
अहिल्याबाई, तू झळकतेस अजुनी,
श्रींच्या कृपेची तूच सुवर्ण छबीनी!
होळकरीण रणराणी, जय जयकार,
तुजवाचून नाही पुरंदर व्यवहार!
गाथा लिहावी अशा देवीची,
जग गात राहो पुण्यकर्मी
अहिल्याबाईची!

------------------------------

लेखन
सौ.पल्लवी मारकड-पारखे
(पिंपरी चिंचवड,पुणे)
सामाजिक कार्यकर्त्या व ऑल इंडिया धनगर (पुणे जिल्हा संघटिका)

This Daily SWARAJYADOOT is Printed, published and owned by BHASKAR GORAKH DEORE and printed at Jijau graphics and offset printers, near mahabij office, ramkrushna nagar, bhaxi road, Satana, Tal- Baglan, Dist- Nashik, Pin-423301 and published at Head office daily SWARAJYADOOT, flat No. 102, Sumangal heights, Siddhivinayak colony, khande nagar, Nashik, Maharashtra - 422008. Editor Shri. Bhaskar Gorakh Deore

# 31 मे 2025 राजमाता अहिल्याबाई होळकर जयंती

## राजमाता अहिल्याबाई होळकर यांच्या जयंतीचे त्रिशताब्दी वर्षा निमित्त त्यांच्या कार्याचा जागर हा "पुण्यश्लोक" या संपादित काव्यसंग्रहाचा पुस्तक परिचय लेखाच्या माध्यमातून सुशिल गायकवाड यांच्या कडून देण्याचा प्रयत्न १३७ कवितांचा "पुण्यश्लोक" संपादित काव्यसंग्रह (काव्यसंग्रहाचे संपादक-पल्लवी मारकड,अजित जाधव,ज.तु.गार्डे)

३१ मे २०२५ रोजी राजमाता अहिल्याबाई होळकर यांचा त्रिशताब्दी जयंती महोत्सव देशात साजरा होत आहे.गल्ली ते दिल्ली पर्यंत अभिवादनाचे कार्यक्रम घेतले जात आहेत.आजही त्यांचे कार्यकर्तृत्व आपल्याला प्रेरक आहे.त्यांचे कार्य समजून घेणे अत्यंत गरजेचे आहे.एक स्त्री एका राज्याचा आदर्श कारभार चालवू शकते.एक मूर्तीमंत उदाहरण म्हणून आपण राजमाता अहिल्याबाई होळकर यांच्याकडे पाहू शकतो.त्यांचे कार्य इतिहासाच्या पाना पानात आढळून येतं.त्यांच्या कार्याला उजाळा देण्याचा प्रयत्न हा साहित्यिक क्षेत्रातून मोठ्या प्रमाणात होऊ लागला आहे.जीवनपट स्वरुपात पुस्तकांची, चित्रपटांची निर्मिती करणे, वर्तमानपत्रात विविध लेख लिहिणे,त्यांच्यावर आधारित कविता लिहिणे,त्या कवितांचा संग्रह हा काव्य पुस्तिकेच्या माध्यमातून देखील प्रकाशित करण्याचा प्रयत्न केला जात असतो.दोन वर्षापूर्वी "पुण्यश्लोक" नावाचा एक काव्यसंग्रह हा

पल्लवी मारकड,अजित जाधव आणि ज.तु.गार्डे यांच्या कडून प्रकाशित करण्यात आला.या काव्यसंग्रहातून राजमाता अहिल्याबाई होळकर यांच्या जीवन चरित्रावर,कार्यावर आधारित एकूण १३७ कवितांचा संग्रह हा संपादित करण्यात आला.

महाराष्ट्रच नव्हे इतर राज्यातील कवींच्या कवितांचा देखील या काव्यसंग्रहातून समावेश करण्यात आला.राजमाता अहिल्याबाई होळकर यांच्या कर्तुत्वाचा व कार्याचा जागर करण्यात आला.

जयंतीचे त्रिशताब्दी वर्षाच्या निमित्ताने "पुण्यश्लोक" या काव्यसंग्रहाचे पुस्तक परिचय देण्याचा प्रयत्न करण्यात येत आहे.ह्या नुसत्या १३७ कवितांचा संग्रहच नसून समाजाला एक प्रेरक दिशा देणारा प्रेरणादायी असाच हा काव्संग्रह आहे.अखंड महाराष्ट्राचे आराध्य दैवत असलेल्या पुरंदर तालुक्यातील जेजुरी खंडोबाच्या भूमीत या काव्यसंग्रहाचे प्रकाशन करण्यात आले होते.हा काव्य संग्रह लोकांच्या पसंतीस पडलेला असून याबाबत अनेकांनी कौतुक देखील केलेले आहे.सामाजिक क्षेत्रात उल्लेखनीय कामगिरी करणाऱ्या व महापुरुषांच्या आणि महामातांच्या कार्याची जागृती करणाऱ्या आदर्की ता.फलटण येथील सुजन फाउंडेशनने प्रकाशक म्हणून उत्तम जबाबदारी पार पाडली आहे.मुखपृष्ठ अधिक प्रेरणादायी वाटते.अहिल्याबाई होळकर स्वतः रणांगणात जात लढल्या होत्या,त्यामुळे घोड्यावर स्वार होऊन लढणारी अहिल्याबाई होळकर ही पुस्तकाच्या मुखपृष्ठावर दिसून येते.महापुरुषांच्या कार्याची ओळख नव्या पिढीला व्हावी म्हणून सुजन फाउंडेशन अनेक उपक्रम रबवित असते.राजमाता अहिल्याबाई होळकर यांच्या कार्याचा प्रचार काव्य पुस्तिकेच्या माध्यमातून करीत उजाळा देण्याचा प्रयत्न करण्यात आलेला आहे.तसेच अहिल्या बाईंची नाती गोती, अहिल्याबाईंच्या आयुष्यातील ठळक घटना मांडण्यात आलेल्या आहेत.असे न्याय प्रिय! मातोश्रींची ख्याती! करमुक्त होती! शेतकरी या अभंगातून ही राजमातांचे कार्य कळून येत आहे. एक हाती शस्त्र, एका हाती शास्त्र,नष्टविला,अन्याय,अत्याचार, अधर्म यातून ही राजमाता अहिल्याबाई होळकर यांचे कार्य अधिक स्पष्ट होत आहे.राजमाता म्हणजे न संपणारं आभाळ,रयतेच्या सौख्यासाठी,मातृत्वाची नाळ हे "पुण्यश्लोक" च्या निमित्ताने व्यक्त करण्यात आलेलं आहे.राजमाता अहिल्याबाई, माहेश्वरी, कार्यक्षमअहिल्याराणी, पुण्यश्लोक,अलौकिक रत्नखाणी,अहिल्यादेवी माझी माय, तू एक झंझावात, तेजस्विनी, सुभेदाराची




सून, तत्त्वज्ञानी महाराणी, मानाचा मुजरा, कर्मयोगिनी, लोककल्याणकारी माता, दानशूर, त्यागमूर्ती, झाली अहिल्या मर्दानी,कर्तृत्वशाली महामेरू,चतुर अहिल्याबाई, स्त्रीशक्ती अहिल्याबाई, कणखर धाडसी समाजरत्नी, दीन दुबळ्याची आई, अहिल्या, गरिबांची माय माऊली, आदर्श भारतीय नारी, लोकमाता, प्रचंड सामर्थ्यशाली अहिल्या, न संपणारं आभाळ यासारख्या सर्वच कविता ह्या वाचनीय आहेत.हे पुस्तक प्रकाशित करण्यापूर्वी अहिल्याबाई होळकर जयंतीचे औचित्य साधून काव्य लेखन स्पर्धा आयोजित करण्यात आली.यातूनच काव्यसंग्रह निर्मिती करण्यात आली.काव्य प्रकाशन सोहळ्या दरम्यानच प्रथम,द्वितीय आणि तृतीय क्रमांकाचे बक्षीस अनुक्रमे मंदाकिनी सपकाळ, विद्या सरपाते, योगिता मापारी, स.ना.जोशी ८आदींना त्यांच्या उत्कृष्ट कविता रचनेबद्दल सन्मान करण्यात आला. समाजात असे अनेक कवी असतात की त्यांना स्वतःचे पुस्तक प्रकाशित करणे सोपे नसते.परंतु अनेक कवींना एकत्र आणून त्या कवींचे एका कविते द्वारे पुस्तकात येणे ही एक खूप मोठी संधी असून या काव्य संग्रहाचे संपादन करण्याचे महत्वपूर्ण काम संपादक म्हणून सामाजिक कार्यकर्त्या व ऑल इंडिया धनगर पुणे जिल्ह्याच्या संघटिका पल्लवी चंद्रकांत मारकड-पारखे, सुजन फाऊंडेशन (आदर्की बुद्रुक) चे अध्यक्ष अजित संपतराव जाधव आणि कवी ज.तु.गार्डे (कापशी) यांनी केल्याने महाराष्ट्रासह मध्यप्रदेश, गुजरात आदी राज्यातून आलेल्या कवितांनी "पुण्यश्लोक" या प्रेरणादायी काव्य संग्रहास जन्म देता आला.

मंदाकिनी सपकाळ, विद्या सरपाते, योगिता मापारी, स.ना.जोशी यांच्यासह विद्या प्रधान,ल.ख.चौधरी गुरुजी,संतोष साळवे,

इम्तियाज तांबोळी, प्रियांका सावंत, सुभद्रासुत आंधळे, आदर्श कदम, डॉ.योगिता शेटे-कदम,जयद्रथ आखाडे, सुवर्णा पवार,

रोहिणी पराडकर, अनिलकुमार शहारे, प्रभाकर दुर्गे, सुनीता जगताप, सरोज गाजरे, आरती कोरडकर,दत्ताहरी कदम,

प्रा.उषा चुरे, स्नेहा चोरमले, डॉ.प्रेमिला तलवाडकर, दत्तात्रय दगडे, करुणा गायकवाड,डॉ.अनिता बेंडाळे,छाया पायमोडे,

रविकुमार जाधव, आश्रुबा कोठावळे, समाधान सम्राट,सुरेश निकंबे,प्रा.पांडुरंग गुंजाळ,गणेश तांबे , टी.के.गोसावी, आशा शिरूडे, अश्विनी नावस्कर, नंदा कोकाटे, संदीप पवार, वसुधा येनकर, वासंती बोराडे, वनिता एलींजे, अल्पना पालकर,सुनिता महाजन, शारदा मालपाणी,पूनम सावंत,समीना शेख,संध्यारजनी सावकार,किशोरी पाटील,आशा दळवी,सुरेशकुमार बोरकर,

महादेव भोकरे, श्रीकांत शिरभाते, मीता नानवटकर, शंकर माने, रेखा मालपुरे, नंदा दशपुते,प्रनोती कळमकर,ललिता टोके,मुक्ता कांबळे, जयश्री बोरसे, विद्या साबळे, जागृती माळी, ज्योती मोकल, सुनिता पडवळ, कल्पना घोळवे,पंकज कासार-काटकर,

सिताराम करकरे, चंद्रकला अमृतकर, अंकिता पाटील, शरद पाटील, शरयू पाम्पट्टीवार, सुनंदा सोनजे, केशव वारे, दामिनी ठिगळे, सुरेखा कोठावदे, सुवर्णा पवार, मंगल मिसाळ, प्रकाश सकुंडे, शर्मिला देशमुख, प्रवीण शांताराम, प्रीती भोजने, भारती पाटील, प्रल्हाद घोरबांड गुरुजी,मंगेश कवटीकवार,प्रकाश भोंगळे,चंचल जाधव,शुभांगी कुंभार,वाघे करुणा,रमेश चव्हाण, छाया सोनवणे, मीनल कुडाळकर, सुरेखा वाघमारे,अर्चना नावडकर,स्नेहा शिंपी,गीतांजली वाघ, प्रकाश वंजारी, श्रीकांत कांबळे, श्रीगणेश शेंडे, सरिता कलढोणे, सचिन पाटील, दिनेश कांबळे,वैशाली पाखले,शितल बाविस्कर,नयना गुरव, तनुजा खाडे, प्रा विठ्ठल काळे, राजश्री परदेशी, सुधा चौधरी, देवदास कारंडे, अनुपमा दाभाडे, धनंजय सोलंकर, संगीता हेंद्रे, ताराचंद आवळे, रेखा गढरी,प्रियंका चव्हाण,डॉ.दादाराव गुंडरे,श्रीकांत गाढवे,

सिद्धेश खामकर, बालाजी भानानगरे, सुनीता कवडे, साक्षी तोरवे, पूर्णिमा शिंदे, रत्नमालाताई पिसे, सीमा सोनवणे, उज्वला बोरावके, नितीन शिंदे, पूजा चोरडिया, अविनाश कदम, ज्योती कदम, दशरथ धायगुडे, लता राजेंद्र, मनीषा घुले, ज.तु.गार्डे आदी कवींच्या कवितांचा समावेश या काव्य संग्रहातून दिसून येतो.

या कवींच्या लेखणीतून, साकारलेल्या या काव्यसंग्रहातून राजमाता अहिल्याबाई होळकर यांच्या जीवनचरित्राचे व त्यांच्या धाडसीपणाचे विविध पैलू उलघडताना दिसून येत आहेत.

**लेखन**
**सुशिल सुदर्शन गायकवाड**
**तरडगाव, ता. फलटण जि. सातारा**

# साक्री तालुक्यातील पंतप्रधान आवास योजना रमाई व शबरी आवास योजना अंतर्गत झालेल्या भ्रष्टाचाराची चौकशी करा

## शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे गटाच्या पदाधिकाऱ्यांनी दिले निवेदन

श्री संजय बच्छाव
धुळे जिल्हा प्रतिनिधी
दैनिक स्वराज्यदूत

-------------------------



साक्री तालुक्यातील पंतप्रधान आवास योजना तसेच रमाई व शबरी आवास योजना अंतर्गत झालेल्या भ्रष्टाचाराची सखोल चौकशी होऊन भ्रष्ट अधिकारी ग्रामसेवक रोजगार सेवक व ग्रामपंचायत सरपंच पदाधिकारी यांच्याकडून होणारे आर्थिक लुटमार थांबवणे व त्यांच्या कठोर कारवाई करण्याची साक्री तालुका शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षातर्फे जाहीर मागणी. साक्री तालुका शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे गटातर्फे पंचायत समिती साक्री येथे निवेदन दिले. साक्री तालुक्यातील ग्रामीण व आदिवासी भागातील बेघर नागरिकांसाठी शासनाने लोककल्याण योजनेच्या पवित्र हेतूने निर्माण केलेल्या घरकुल योजना प्रधानमंत्री आवास योजना रमाई व शबरी आवास योजना या योजनेच्या कामात लाखो रुपयांचा भ्रष्टाचार होत असून सर्वसामान्य बेगर शेतकरी आदिवासी दलित नागरिक तसेच निराधार परिचारक महिला भगिनी व जास्त करून आदिवासी समाजा च्या बांधव यांच्याकडून ग्रामपंचायततील संबंधित पदाधिकारी तसेच ग्रामसेवक सरपंच ग्रामपंचायत रोजगार सेवक तसेच ग्रामपंचायत पदाधिकारी यांच्याकडून घरकुल मंजूर मंजुरीसाठी हजार रुपयाची मागणी केली जाते अन्यथा कुठलाही कागदपत्र लाभार्थी गरज व्यक्तीला दिले जात नाही तसेच लाभार्थींचे मंजूर घरकुलचे चेक काढताना १०००० ते १५००० हजार रुपयांची मागणी केली जाते अशा प्रकारचे शेकडो तक्रारी ग्रामीण आदिवासी भागातील गरीब बेघर नागरिकांकडून आमच्या साक्री तालुका शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) पक्षाकडे तक्रारी प्राप्त झालेले आहेत तरी या विषयावर सर्व भ्रष्ट व लुटारू अधिकारी कर्मचारी ग्रामसेवक रोजगार सेवक ग्रामपंचायतपदाधिकाऱ्यांचे विरुद्ध त्वरित कठोर कारवाई करण्यात यावी अशी आम्ही सर्व शिवसैनिक व नागरिक करीत आहोत येथे आठवड्यात या विषयावर त्वरित कारवाई न झाल्यास आम्ही सर्व शिवसैनिक व शोषित नागरिक पंचायत समिती येथे तिव्र व उग्र स्वरूपाचे आंदोलन करण्यात येईल व या विषयावरील पुढील परिणामास शासन जबाबदार राहील असे निवेदनाद्वारे नमूद करीत आहोत यावेळी निवेदन देताना रुग्णसेवक किशोर आप्पा वाघ शिवसेना धुळे जिल्हा समन्वयक, तालुकाप्रमुख तुषार भाऊ गवळी, शिवसेना साक्री शहर प्रमुख हिम्मत भाऊ सोनवणे,शिवसेना उपतालुकाप्रमुख केशव भाऊ शिंदे, उपतालुकाप्रमुख पप्पू भाऊ माळी,विभाग प्रमुख भूषण भाऊ माळी, सदाभाऊ गोयकर, पांडुरंग शिंदे, नंदू दादा माळशे, नाना शिंगाडे, योगेश गोवेकर, दरबार राठोड, रत्नाबाई वाघ, बानू बाई माळचे, वेणूबाई अहिरे, आधी शिवसैनिक शेतकरी बांधव उपस्थित होते.

# छत्रपती शिवाजी महाराजांच्या इतिहासाला सी बी एस इ इंग्रजी माध्यमाचे विद्यार्थी पोरके

## सीबीएसइ अभ्यासक्रमात पहिली ते बारावीत शिवरायांवर फक्त एक धडा आणि 68 शब्द!

श्री संजय बच्छाव
धुळे जिल्हा प्रतिनिधी
दैनिक स्वराज्यदूत

-----------------------



साडेतीनशे वर्षांपूर्वी मासाहेब राजमाता जिजाऊंनी हिंदवी स्वराज्य व्हावे ही इच्छा छत्रपती शिवाजी महाराजांजवळ बोलून दाखवली व ती प्रत्यक्षात त्यांच्या डोळ्या देखत छत्रपती शिवाजी महाराजांनी करून दाखवली. शेकडो गड, किल्ले, स्वराज्यच्या राजधानी घेऊन शेकडो लढाया लढवून, लाखो - हजारो मावळ्यांनी बलिदान दिले, हजारो माता-भगिनी विधवा झाल्यात, स्वराज्यासाठी बलिदान देऊन लाखो हजारो सैनिक धारातीर्थ पडले तेव्हा कुठे हे हिंदवी स्वराज्याची निर्मिती झाली.अशा थोर छत्रपती शिवाजी महाराजांचा व महान कर्तबगार "छत्रपतींचा छावा शंभूराजे" व मावळ्यांचा इतिहास या राज्याच्या सरकारला कळत नाही हेच त्यांचे दुर्दैव. अशा थोर महान छत्रपती छत्रपती शिवाजी महाराजांचे पहिली ते बारावी पर्यंतच्या सीबीएसई अभ्यासक्रमाच्या पाठ्यपुस्तकात एकही धडा नाही हे त्यांचे दुर्दैव समजावे का?

एवढ्या महान महापुरुषांबद्दल केंद्र व राज्य सरकारची इतकी मोठी अनास्था का आहे...? महात्मा ज्योतिराव फुले, राजश्री शाहू महाराज, कर्मवीर भाऊराव पाटील, डॉ. बाबासाहेब आंबेडकर, अण्णाभाऊ साठे, राजमाता अहिल्याबाई होळकर, सावित्रीबाई फुले तर दूरच आहेत. कशी घडेल पुढची पिढी याचा विचार कधी केला का..? पुढच्या पुढील इतिहास समजेल का? अभ्यासक्रमात छत्रपती शिवाजी महाराजांचा इतिहासाचा समावेश करण्याची घोषणा शालेय शिक्षण मंत्री श्री दादा भुसे यांनी केली असली तरी सध्याच्या अभ्यासक्रमात छत्रपती शिवाजी महाराजांविषयी एक धडा आणि ६८ शब्द देण्यात आल्याचे धक्कादायक वास्तव्य सर्वेक्षणात दिसून आले आहे. एवढाच इतिहास जर पुढच्या पिढीला समजला तर काय होईल याचा सरकारने विचार करावा व छत्रपती शिवाजी महाराजांचा संपूर्ण इतिहास हा पाठ्यपुस्तकात घ्यावा अशी सर्व शिवभक्तांची इच्छा आहे.

अल्पावधीत संपूर्ण महाराष्ट्रात लोकप्रिय झालेल्या
दैनिक स्वराज्यदूत
या वृत्त पत्रामध्ये वार्ताहर , जाहिरात प्रतिनिधी , गाव, तालुका तसेच जिल्हा पातळीवर काम करण्याची सुवर्ण संधी
आजच संपर्क करा ८४४६६७३६७७

# तांत्रिक अडचणीमुळे व जुन्या किट मुळे बंद पडलेले आधार केंद्र तात्काळ सुरु करून नागरिकांची हेळसांड थांबवा- महेंद्र गायकवाड यांची मागणी

## नवीन आधार केंद्र सुशिक्षित बेरोजगार,दिव्यांग व्यक्ती, तृतीयपंथी, परितक्त्या, विधवा महिला व दुर्धर आजारग्रस्त व्यक्तींना द्या

मनोज बिरादार
नांदेड जिल्हा प्रतिनिधी
दैनिक स्वराज्यदुत
--------------------



नांदेड शहरात व जिल्ह्यात कांही आधार केंद्र तांत्रिक अडचणीमुळे व जुन्या किट मुळे बंद अवस्थेत असल्याने विद्यार्थी, जेष्ठ नागरिक, महिला, पुरुष यांची मोठ्या प्रमाणात हेळसांड होत असल्याने सदरील आधार केंद्राना नवीन व जास्तीच्या किट उपलब्ध करून बंद अवस्थेतील आधार केंद्र व नवीन आधार केंद्र सुशिक्षित बेरोजगार, दिव्यांग व्यक्ती, तृतीयपंथी, परितक्त्या, विधवा महिला व दुर्धर आजारग्रस्त व्यक्तींना देऊन नागरिकांची होणारी हेळसांड थांबवावी अशी मागणी पत्रकार संरक्षण समितीचे जिल्हाध्यक्ष महेंद्र गायकवाड यांनी एका निवेदनाद्वारे जिल्हाधिकारी राहुल कर्डीले यांच्या कडे केली आहे.

नांदेड शहरात व जिल्ह्यात तांत्रिक अडचणीमुळे कांही आधार कार्ड केंद्र बंद अवस्थेत आहेत तर कांही आधार कार्ड केंद्राच्या किट जुन्या अवस्थेत असल्याने नागरिकांचे आधार अपडेट, नवीन आधार कार्ड काढणे, व आधार कार्ड संबधी अनेक कामे होत नाहीत. तसेच सध्या विद्यार्थ्यांचे नवीन शैक्षणिक वर्ष सुरु होणार असल्याने विद्यार्थ्यांना नवीन आधार कार्ड ची आवश्यकता आहे. त्यामुळे शहरातील व जिल्ह्यातील विद्यार्थी, जेष्ठ नागरिक, महिला, पुरुष यांना नवीन आधार कार्ड, आधार कार्ड अपडेट, तसेच आधार कार्ड संबधी अनेक समस्या निर्माण झाल्या आहेत. सन २०१२ पासून जुन्या आधार कार्ड किट वरच ऑपरेटर काम करीत असल्याने संथ गतीने कामे होत आहेत.सध्या जिल्ह्यात सुपरवाइजर व ऑपरेटरची संख्या उपलब्ध असून हि नवीन किट नसल्या कारणाने आधार कार्ड केंद्राची सुविधा विस्कळीत झाली आहे. सध्या स्थितीत आधारकार्ड अपडेट करण्यासाठी व नवीन आधार कार्ड काढण्यासाठी नवीन किटची जास्त प्रमाणात गरज आहे. जुन्या किटमुळे तांत्रिक अडचण निर्माण होत आहे व किटची संख्या कमी असल्याने नागरिकांची आधारची कामे होत नाहीत त्यामुळे विलंब लागत आहे.या कारणाने शहरातील नागरिकांना रात्रभर पोस्ट ऑफिस समोर व तहसील कार्यालयासमोर रांगेत उभे रहावे लागत आहे.तसेच जिल्ह्यातील ग्रामीण भागातील ग्रामस्थ, नागरिकांची मोठ्या प्रमाणात हेळसांड होत आहे. त्यामुळे जिल्हाधिकाऱ्यांनी तात्काळ नांदेड शहरासह जिल्ह्यातील प्रत्येक तालुक्यात नवीन आधार कार्ड केंद्र व बंद अवस्थेत असलेले आधार कार्ड केंद्र त्वरित सुरु करून हे आधार कार्ड केंद्र सुशिक्षित बेरोजगार, दिव्यांग व्यक्ती, तृतीयपंथी परितक्त्या, विधवा महिला व दुर्धर आजारग्रस्त व्यक्तींना देऊन नागरिकांची हेळसांड थांबवावी अशी मागणी पत्रकार संरक्षण समितीचे जिल्हाध्यक्ष महेंद्र गायकवाड यांनी एका निवेदनाद्वारे जिल्हाधिकारी यांच्याकडे केली आहे.

# अवकाळी पावसामुळे शेतकऱ्यांचे मोठे नुकसान

मनोज बिरादार
नांदेड जिल्हा प्रतिनिधी
दैनिक स्वराज्यदुत
-------------------



मुखेड तालुक्यात बेमोसमी अवकाळी पावसाच्या पाण्याने शेतकऱ्याचे अतोनात नुकसान झालेले असून जीवित हानी होऊन शेतकऱ्यांच्या अनेक जनावरे दगावलेली असल्यामुळे तात्काळ पंचनामे करून भरपाई द्यावी. मुखेड तालुक्यात व परिसरात गेल्या दहा ते पंधरा दिवसापासून सतत धार पाऊस सुरू आहे बेमोसमी आलेल्या पावसामुळे मुखेड तालुक्यातील शेतकऱ्यांचे नुकसान झालेले आहे. दिनांक २७ मे रोजी झालेल्या अवकाळी पावसामुळे मुखेड तालुक्यातील चांडोळा, केरूर ,होनवडज ,जांभळी, तांदळी , बिल्लाळी , अशा अनेक गावातील जनतेचे व शेतकऱ्याचे अतोनात नुकसान झालेले आहे सध्या शेतकऱ्याचे मोसंबी पेरू उन्हाळी हायब्रीड भुईमुगाचे पीक तोंडावर आलेले असताना या बे मोसमी पावसामुळे हातात तोंडाशी आलेल्या घास हिसकावून घेण्यात आला सारखे पावसामुळे पूर्णपणे नासाडी झालेली आहे नदी काठावरील शेतकऱ्यांच्या मोटारी शेतातील पाईप ही पुराच्या पाण्यात वाहून जाऊन खूप मोठे आर्थिक नुकसान झालेली आहे आज घडीला शेतकरी आर्थिक संकटात सापडलेला आहे तरी मा तहसीलदार साहेबांनी सदरील पूरग्रस्त गावातील संपूर्ण शेतकऱ्याचे पंचनामे करून झालेल्या नुकसानी बदल शेतकऱ्यांना नुकसान भरपाई देऊन शेतकऱ्यांवरील आर्थिक संकट दूर करावे. यावेळी उपस्थित सचिन पाटील इंगोले गिरीधर पाटील केरूरकर नागेश पाटील शिंदे, वीरभद्र आप्पा स्वामी, अमोल जी मोरे, राजू पाटील दुरनाळे ,सय्यद मोहम्मद रफीक ,विनायक पाटील इंगळे , अर्जुन सोनकांबळे आदी शेतकरी उपस्थित होते

# मुखेड तालुक्यात प्रभारी गटशिक्षणाधिकारी पदावर हमीद दौलताबादी रुजू

मनोज बिरादार
नांदेड जिल्हा प्रतिनिधी
दैनिक स्वराज्यदुत
-------------------



मुखेड तालुक्यात तत्कालीन प्रभारी गटशिक्षणाधिकारी होनधरणे कैलास कार्यरत होते. त्यांची बदली किनवट तालुक्यात झाल्याने मुखेड तालुक्यात गटशिक्षणाधिकारी पदावर हमीद दौलताबादी ज्येष्ठ शिक्षण विस्तार अधिकारी रुजू झाले. हमीद दौलताबादी प्रभारी गटशिक्षणाधिकारी हे मुळ आपल्याच मुखेड तालुक्याचे रहिवाशी असून मागील पंचवीस वर्षापासून शिक्षण विस्तार अधिकारी पदावर कार्यरत आहेत. ते M.sc M.ed उच्चशिक्षीत असून मागील ६ ते ७ वर्षे हिमायतनगर, देगलूर, बिलोली तालुक्याचे प्रभारी गटशिक्षणाधिकारी पदाचे उत्कृष्ट पदभार सांभाळलेले आहेत. त्यांच्या सेवेत उत्कृष्ट काम केल्याबाबत दोन वेतनवाढ मिळाले आहे. हमीद दौलताबादी हे आपल्या तालुक्यात सेवेसाठी उपस्थित झाले ही अतिशय आनंदाची आणि गौरवाची बाब आहे. शिक्षण क्षेत्रात आपल्या नेतृत्वाची आणि उत्कृष्ट कार्यक्षमतेचा ठसा पूर्वापारच उठून दिसणार आहे. आपल्या कार्यपध्दतीत सुयोजित, कामाची शिस्त, विद्यार्थ्यासाठीचा आपुलकीचा दृष्टीकोन, शिक्षकांचे प्रश्न सोडवण्याची आणि शिक्षण व्यवस्थेत सकारात्मक बदल घडवून आणण्याची जिद्द हे सर्वच कौतुकास्तक आणि प्रेरणादायी आहे. नेहमीच गुणवत्तापूर्ण शिक्षण, शाळांमध्ये उपक्रमशिलता वाढविणे, विद्यार्थ्याचा सर्वांगीण विकासावर भर देणे. यासाठी प्रामाणिक प्रयत्न करत आले आहे. मुखेड तालुक्यातील शिक्षण व्यवस्थेत नवे बळ, नवी दिशा आणि नव्या आशा निर्माण झाल्या आहेत.

# शेतकऱ्यांच्या सन्मानार्थ संभाजी ब्रिगेड मैदानात

सुयोग ठाकरे
तालुका प्रतिनिधी
धामणगाव रेल्वे
दैनिक स्वराज्यदूत
---------------------------



दि. २९ मे रोजी संभाजी ब्रिगेड धामणगाव रेल्वे तर्फे मा. तहसीलदार साहेब यांना निवेदन देण्यात आले. सतत होत असलेल्या अवकाळी पावसामुळे तीळ या पिकाचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले आहे तरी शासनामार्फत लवकर लवकर पंचनामे करून शेतकऱ्यांना हेक्टरी ५० हजार रुपये आर्थिक मदत सरकार ने करावी यासाठी संभाजी ब्रिगेड धामणगाव तर्फे मा.तहसीलदार साहेब यांच्या मार्फत अमरावती जिल्ह्याचे पालकमंत्री मा.चंद्रचेखरजी बावनकुळे यांना निवेदन दिले यावेळी उपस्थित संभाजी ब्रिगेडचे जिल्हा उपाध्यक्ष गजानन मानकर संभाजी ब्रिगेड तालुका अध्यक्ष सुयोग ठाकरे विद्यार्थी आघाडी तालुकाध्यक्ष मानस बोरघाटे, गोपाल पेदाम,सागर सोनटक्के, आशिष तुपट अजिंक्य शेंडे प्रशांत कापसे व संभाजी ब्रिगेड धामणगाव चे सर्व सहकारी उपस्थित होते

# जिल्ह्यात एकही बालविवाह होणार नाही याची दक्षता घ्या : जिल्हाधिकारी कर्डिले

मनोज बिरादार
नांदेड जिल्हा प्रतिनिधी
दैनिक स्वराज्यदुत
------------------------



जिल्हा बालविवाह मुक्त करण्यासाठी सर्वांनी समन्वय साधून एकत्रित प्रयत्न करणे आवश्यक आहे. बालविवाह निर्मूलन ही चळवळ अधिक सक्रिय करण्यासाठी सर्वांचे योगदान महत्त्वाचे असून जिल्ह्यात एकही बालविवाह होणार नाही याची सर्वांनी दक्षता घ्यावी, असे आवाहन जिल्हाधिकारी राहुल कर्डिले यांनी केले. बालविवाह निर्मूलन जिल्हा कृती दलाच्या माध्यमातुन बालविवाह निर्मूलन करण्यासाठी महिला व बालविकास विभाग, पंचायत, आरोग्य, शिक्षण, महिला व बाल कल्याण विभाग (जि.प.), उमेद या सर्व विभागांच्या संयुक्त विद्यमाने तयार करण्यात आलेला " बालविवाह मुक्त नांदेड जिल्हा" हा कृती आराखडा प्रभावीपणे राबविण्यासाठी संबंधित सर्व विभागांनी "बालविवाह निर्मूलन चॅम्पियन्स" ची नियुक्ती केली आहे. या सर्व विभागाच्या चॅम्पियन्ससाठी एकदिवसीय प्रशिक्षण जिल्हाधिकारी कर्डिले यांच्या अध्यक्षतेखाली नुकतेचे २८ मे रोजी हॉटेल सिटी सिंफोनी नांदेड येथे संपन्न झाले. त्यावेळी ते बोलत होते. यावेळी जिल्हा परिषदेच्या उपमुख्य कार्यकारी अधिकारी श्रीमती मंजुषा कापसे, शिक्षणाधिकारी प्रा. श्रीमती सविता बिरगे, महिला व बाल कल्याण विभागाचे उपमुख्य कार्यकारी अधिकारी प्रशांत थोरात, उपशिक्षणाधिकारी रामचंद्र पाचंगे, परिवीक्षा अधिकारी गजानन जिंदमवार, जिल्हा बाल संरक्षण अधिकारी विद्या आळणे यांची प्रमुख उपस्थिती होती. बालविवाहाच्या कोणत्याही प्रकरणात दिरंगाई होणार नाही याबाबत सर्वांनी कटाक्षाने कायद्याचे पालन करावे. बालविवाहात कोणतेही बालक ओढले जाणार नाही यासाठी सर्वांनी सतर्क राहून कार्य करण्याच्या सूचना जिल्हाधिकारी राहुल कर्डिले यांनी दिल्या. बालविवाह निर्मूलन जिल्हा कृती आराखड्याची प्रभावी अंमलबजावणी करण्याबाबत सूचना देऊन प्रशिक्षणार्थ्यांशी जिल्हाधिकारी कर्डिले यांनी मनमोकळा संवाद साधला. या प्रशिक्षणात आराखडयाची अंमलबजावणी, पाठपुरावा, नियोजन, माहिती विश्लेषण, समन्वय, मूल्यमापन आणि संनियंत्रण संदर्भातील गुगल फार्मवर देखरेख तालुका निहाय, बालविवाहाची कारणे व विभाग निहाय उपाय व हॉटस्पॉट गावाची ओळख, महाराष्ट्रातील बालविवाहाचे प्रमाण परिणाम, सक्षम कार्यक्रम आढावा, बालहक्क, बालविवाह प्रतिबंध अधिनियम २००६, असुरक्षित बालकांची ओळख, बालविवाह प्रकरण हाताळणे हेतु कार्यवाही व पाठपुरावा, किशोरवयीन मातांसाठी सहाय्य करण्यासाठी यंत्रणांचे बळकटीकरण विभागांचा दृष्टिकोण व समन्वय, बालविवाह निर्मूलन चॅम्पियन्सची भुमिका आणि जबाबदारी, कम्युनिकेशन किट, युनिसेफचे-बालविवाह समाप्त करण्यासाठी जागतिक कार्यक्रम, बालविवाह निर्मूलन जिल्हा कृती आराखडा कार्यान्वयन योजना तयार करणे, साप्ताहिक देखरेखीचे फॉरमेट तयार करणे, जिल्हा कृती दल बैठकीसाठी अहवाल तयार करणे, जिल्हा कृती आराखड्यासाठी सहाय्य व नियोजन, महिती संकलन आणि विश्लेषण, प्रेरणादायी व सकारात्मक प्रकरणांचे दस्तऐवजीकरण आदी विषयांवर हे प्रशिक्षण घेण्यात आले. या प्रशिक्षणासाठी जिल्ह्यातील पंचायत विभाग, आरोग्य विभाग, शिक्षण विभाग, महिला व बाल कल्याण विभाग (जि.प.), जिल्हा महिला व बाल विकास अधिकारी कार्यालयांतर्गत जिल्हा बाल संरक्षण अधिकारी कार्यालय कर्मचारी, चाईल्ड लाईन १०९८ कर्मचारी, राष्ट्रीय किशोर स्वास्थ्य कार्यक्रम (RKSK), महाराष्ट्र राज्य ग्रामीण जीवनोन्नती अभियान (उमेद अभियान) यांनी नियुक्त केलेल्या एकूण " बालविवाह निर्मूलन चॅम्पियन्स" यांना प्रशिक्षण देण्यात आले. या प्रशिक्षणास साधन व्यक्ती म्हणून एसबीसीथ्रीचे बालविवाह निर्मूलन प्रकल्पाचे प्रकल्प अंमलबजावनी प्रमुख नंदू जाधव, वरिष्ठ प्रकल्प समन्वयक कृपाली बढिये, प्रकल्प समन्वयक रुचिका अहिरे, मोनाली धुर्वे उपस्थित होते. सदर प्रशिक्षणात संबंधित सर्व विभागातील बालविवाह निर्मूलन चॅम्पियन्स यांचा उत्कृष्ट सहभाग होता.

# आम्ही वारकरी परिवार सेवाभावी संस्थेकडून पंढरपूर येथील धर्मशाळेचा भूमिपूजन सोहळा संपन्न होणार

मनोज बिरादार
नांदेड जिल्हा प्रतिनिधी
दैनिक स्वराज्यदुत
------------------------






आम्ही वारकरी परिवार सेवाभावी संस्था गेल्या सात वर्षापासून विविध सामाजिक, धार्मिक कार्यामध्ये जिल्ह्यामध्ये नेहमी अग्रेसर आहे. संस्थेच्या माध्यमातून आजपर्यंत ९५४५ साधकांना मोफत व घरपोच ग्रंथराज ज्ञानेश्वरी भेट देऊन पारायण करण्यास बसवले आहे. याचप्रमाणे प्रत्येक साधकांनी एक झाड लावावे ही प्रतिज्ञा साधकांनी पूर्ण केली आहे. तसेच रक्तदान शिबिराच्या माध्यमातून संस्थेने सामाजिक कार्यास हातभार लावला आहे आणि सर्वात महत्त्वाचं म्हणजे जिल्ह्यातील व राज्यभरातील गोरगरीब वारकऱ्यांच्या सोयीसाठी सर्वांच्या योगदानातून व सहकार्यातून पंढरपूर येथे धर्मशाळा उभारण्यासाठी पंढरपूर महानगरपालिकेमध्ये संस्थेच्या नावे जागा घेण्यात आली आहे. त्या जागेवर धर्मशाळेचे बांधकाम सुरू करण्यात येणार आहे. त्या बांधकामाचा भूमिपूजन सोहळा दि:०९ जून सोमवार रोजी सकाळी ११:०० वा. श्री गुरुवर्य प्रयागगिरीजी महाराज,श्री ब्रह्मानंद सरस्वतीजी महाराज,श्री नराशाम महाराज, श्री गजेंद्र चैतन्यजी महाराज,श्री मधुसूदन महाराज व अनेक साधुसंतांच्या हस्ते संपन्न होणार आहे. या भूमिपूजन सोहळ्यासाठी संस्थेचे सर्व मार्गदर्शक श्री रावसाहेब पा.,श्री दत्तराम पा.,श्री रामजी पा.,श्री व्यंकटराव पा. कपाटे, श्री व्यंकटराव पा.ढगे, श्री रामराव महाराज माने, श्री दत्तराम गोरठेकर, श्री शिवाजी पांगरेकर,श्री बालाजी जाधव, श्री गंगाधर पा. भरकडे ,केशव पा. कौशल्ये,श्री गणेश पा.पवार व सर्व मार्गदर्शक आणि सल्लागार. महिला आघाडी जिल्हाध्यक्षा सौ.अनिताताई पतंगे, जिल्हा सचिव सौ. कालिंदीताई पंढरपूरकर, उपाध्यक्षा सौ.कान्होपात्राताई कुंडलवाडीकर, महिला सदस्य सौ.कुसुमताई शिंदे, सौ.नंदाताई गाढे, सौ.जयश्रीताई जाधव व सर्व महिला आघाडी, याचप्रमाणे राज्यस्तरीय, जिल्हास्तरीय व तालुकास्तरीय सर्व पदाधिकारी उपस्थित राहणार आहेत.. या कार्यक्रमासाठी संस्थेचे संस्थापक अध्यक्ष हभप राम महाराज पांगरेकर, संस्थापक सचिव हभप व्यंकट महाराज जाधव माळकौठेकर, कोषाध्यक्ष श्री शिवाजी मदमवाड ,सहसचिव श्री प्रभाकर महाराज पुय्यड, संस्थापक सदस्य श्री गुलाब पा.उबाळे, श्री हरिनाम पा.कदम, श्री त्रिमुख पा. एडके, श्री बंडू पा.कदम, श्री प्रवीण रौतुलवाड, श्री भगवान पा.रहाटीकर, सर्व तालुका अध्यक्ष विश्वनाथ बंडे,नागोराव मेंढेवाड, प्रभाकर पा.पवळे, बालाजी पा.शिंदे, सोपान पा.गिरे, मुंजाजी पा.धुमाळ, मधुसूदन पा.कदम, विठ्ठल पा. धारजणे, मारोती पा.वडजे, राजेश्वर पा.गागलेगावकर, मदन घुगे, विवेकानंद पा.कसरे, कृष्णाजी पा.भरकडे, शंकर देवकत्ते, माधवराव बोईनवाड, बालाजी पांढरे परिश्रम घेत आहेत.

# "१०० दिवसांची कार्यालयीन सुधारणा मोहिमेअंतर्गत देगलुर कार्यालयाची प्रथम क्रमांकाने निवड, उपविभागीय अधिकारी अनुप पाटील यांना गौरव"

मनोज बिरादार
नांदेड जिल्हा प्रतिनिधी
दैनिक स्वराज्यदुत
-----------------------




छत्रपती संभाजीनगर, ३० मे २०२५ – छत्रपती संभाजीनगर विभागात दिनांक ०७ जानेवारी २०२५ ते ०२ मे २०२५ या कालावधीत राज्यशासनाच्या निर्देशानुसार राबविण्यात आलेल्या "१०० दिवसांची कार्यालयीन सुधारणा मोहीम" मध्ये उत्कृष्ट कार्य करणाऱ्या देगलुर उपविभागीय अधिकारी कार्यालयाची प्रथम क्रमांकाने निवड करण्यात आली आहे. या शानदार कामगिरीबद्दल अनुप पाटील, उपविभागीय अधिकारी, देगलुर जि. नांदेड यांना छत्रपती संभाजीनगर विभागीय आयुक्त कार्यालयात आयोजित समारंभात गौरविण्यात आले. विभागीय आयुक्त मा. दिलीप गावडे यांच्या हस्ते त्यांना प्रशस्तीपत्र देऊन त्यांच्या आणि त्यांच्या टीमच्या उत्कृष्ट कार्याची प्रशंसा करण्यात आली.

"१०० दिवसांची कार्यालयीन सुधारणा मोहिम" अंतर्गत राज्यशासनाने विभागीय कार्यालयांमध्ये कार्यक्षमता, पारदर्शकता आणि लोककल्याणकारी सेवांचा दर्जा सुधारण्यासाठी हे अभियान राबविले होते. यामध्ये देगलुर कार्यालयाने सर्वोत्तम कार्यप्रदर्शन केल्याबद्दल विशेष गौरव करण्यात आला.

PASSWORD PROTECTED PAGE